# आरे ते वरळी मेट्रो धावणार

## आठवडाभरात चाचणी फेऱ्या सुरु होणार ; एमएमआरसीची माहिती

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबईतील पहिली भूमिगत मेट्रो प्रवाशांच्या सेवेसाठी लवकरच सज्ज होणार असून, आता लवकरच आरे ते वरळी टप्पाही पूर्ण होणार आहे. सध्या आरे ते बीकेसी चाचणी फेऱ्या सुरू आहेत. ही चाचणी झाल्यानंतर रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून प्रमाणपत्र मिळेल व त्यानंतर पहिल्या भूमिगत मेट्रोतून मुंबईकर प्रवास करू शकतील. दरम्यान, आता आरे ते वरळी टप्पाही चाचणीसाठी सज्ज झाला असून, आठवड्याभरात येथे चाचणी घेण्यात येणार आहे. रुळ, इतर यंत्रणेची चाचणी करण्यासाठी मेट्रो गाडी वरळीपर्यंत नेण्यात येणार आहे. मेट्रो-३ ही मुंबईतील पहिली भुयारी मेट्रो मार्गिका आहे. ३३.५ किमी लांबीच्या या मार्गिकेचे काम सध्या वेगात सुरु आहे. लवकरच आरे- बीकेसी असा पहिला टप्पा वाहतूक सेवेत दाखल केला जाणार आहे.

### पहिला टप्पा लवकरच सेवेत येणार

आरे ते बीकेसीदरम्यान पहिला टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्याच्या अनुषंगाने आतापर्यंत आरे ते बीकेसी अशी मेट्रो गाडी चालविली जात आहे. गाडी, रूळ आणि इतर यंत्रणेच्या चाचण्या करण्याचे काम सुरू आहेत. आता मात्र या आठवड्यापासून आरे- वरळीदरम्यान मेट्रो गाडी चालवून चाचण्या करणार असल्याची माहिती 'एमएमआरसी'तील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.



### आरे-कुलाबादरम्यान भूयारीकरण पूर्ण

आरे- कुलाबादरम्यानचे भुयारीकरण आणि रुळांचे काम याआधीच पूर्ण झाले आहे. तर वरळीपर्यंत सिग्नलसह इतर यंत्रणांची कामेही पूर्ण झाली आहेत. महत्त्वाचे म्हणजे बीकेसी-वरळी असा दुसरा टप्पा येत्या काही महिन्यांत एमएमआरसीला वाहतूक सेवेत दाखल करायचा आहे. त्यामुळे विविध प्रकारच्या चाचण्या करण्यासाठी आता थेट वरळीपर्यंत मेट्रो गाडी नेण्यात येणार आहे.